संज १९६१

# सर्वोदयाचे आधार

विनोबा

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १२९०

REFBK-0011505

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

# सर्वोदयाचे आधार

[ बेजवाडा येथें ता. १६ ते १९ डिसेंबर १९५५ ला
दिलेलीं चार प्रार्थना प्रवचनें ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 28134 वि: ...
क्रमांक 1201 नों: दि: 25.11.55

**विनोबा**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
का. क्र. 92405
REFBK-0011505

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

प्रकाशक
भाऊ पानसे
ग्रामसेवा मंडळ
परंधाम विद्यापीठ,
पवनार ( वर्धा )

प्रति ५०००
किमत चार आणे

मुद्रक :—
गो. भा. जोशी
भास्कर छापखाना,
वर्धा.

# जीवनाचे चार आधार

मीं अनेक वेळां म्हटलें आहे कीं ग्रामीण जनता ईश्वराची सेवा करीत असते, तिच्याशीं नागरिकांनीं संपर्क ठेवला पाहिजे. ईश्वराच्या या सेवकांची सेवा नागरिकांनीं करायला हवी. अशा रीतीनें नागरिक व ग्रामीण यांमधें जेव्हां प्रेम निर्माण होईल तेव्हां भारतामधें एकरूपता आणि एकरसता निर्माण होईल.

ग्रामीण लोकांच्या गुणांचा अभ्यास नागरिकांनीं करायला हवा. ग्रामिणांना शरीरश्रमाची संवय असते, नागरिकांना ती नसते. शरीरश्रमाची, व्यायामाची, आवश्यकता प्रत्येकाला असते. व्यायामाशिवाय अन्न पचन होत नाहीं, म्हणून शहरांत व्यायामशाळा उघडलेल्या असतात तेथें लोक दहा पंधरा मिनिटें दंड बैठका काढतात. यांत घामाशिवाय कसलें च उत्पादन होत नाहीं. त्यांना समजवायला हवें कीं जो व्यायाम घ्यायचा तो उत्पादक असावा. नागरिक आणि ग्रामीण यांच्या जीवनांत हें असें अंतर आहे. शिक्षित लोक व्यायामाव्यतिरिक्त कोणता च शरीरश्रम करीत नाहींत. डंबेल्स घेऊन हवेंत फिरवीत बसतात. ज्यांतून कांहीं उत्पादन होत नाहीं असलें काम प्रतिष्ठित समजलें जातें. उत्पादन करुन, आम्ही स्वतःला मजूर म्हणवून घेतलें तर काय बिघडेल ? पण मजुरांबद्दल आम्हांला इतका तिटकारा आहे कीं तें नांव सुद्धां आम्हांला रुचत नाहीं. काम करणाराला आम्ही हलका समजतों. घाण करणारा ‘ नागरिक ’ समजला जातो आणि सफाई करणारा ‘ अस्पृश्य ’ समजला जातो ! नागरिकांनीं ही वृत्ति सोडून ग्रामिणांचे सेवक बनलें पाहिजे असें होईल तेव्हां च ‘ सर्वोदय ’ होईल.

## ‘ सर्व सेवा संघ ’

हा ‘सर्व-सेवा-संच’ काय आहे ? महात्माजींनीं ग्रामिणांच्या सेवेसाठीं अनेक संस्था उभ्या केल्या होत्या. त्या सर्व अलग अलग काम करीत होत्या. त्या संस्थांनीं एकवटून एक विशाल संस्था उभी केली ती च ‘ सर्व-सेवा-संघ

## सर्व-सेवा म्हणजे काय ?

यांतील ‘ सर्व ’ शब्द फार महत्त्वाचा आहे. तशी कांहीं ना कांहीं सेवा लोक करीत च असतात पण ती सेवा ‘ सर्व ’ सेवा नसते. पुष्कळसे लोक ‘ अ-सर्वा ’ ची सेवा करीत असतात. जातिवादी लोक ‘ असर्ववादी ’ म्हणायचे. कोणी म्हणतो आम्ही ब्राह्मणांची सेवा करूं, कोणी म्हणतो मुसलमानांची सेवा करूं, अशा रीतीनें लहान लहान गटांची सेवा जे करतात ते संप्रदायवादी होत. दुसरे कम्युनिस्ट. ते सुद्धां ‘ असर्ववादी ’ च. ते म्हणतात, समाजांत दोन वर्ग आहेत : एक सासरा आणि दुसरा जांवई. या दोघांत परस्पर विरोध कल्पून ते म्हणतात कीं आम्हांला एका वर्गाची सेवा करायची आहे. म्हणजे समाजाचे दोन तुकडे ते कल्पितात. ते सेवाभावनेनें कार्य करतात, त्यांच्या अंत:करणांत प्रेम असतें, खरेपणा असतो, पण ते समजाचें विभाजन करतात आणि एका वर्गाचे पक्षपाती बनून काम करतात.

बिरबल व बादशहाची गोष्ट तुम्हांला माहीत आहे. बादशहानें आज्ञा केली कीं जेवढे जांवई असतील त्या सर्वांना फांशीची शिक्षा द्यायची. बिरबलानें पुष्कळसे लोखंडी सूळ बनविले. त्याबरोबर एक चांदीचा व एक सोन्याचा सूळ बनविला.

बादशहानें विचारलें : 'सर्व तयारी झाली ना ?' बिरबल म्हणाला : 'होय, सर्व तयारी झाली.' बिरबलानें बादशहाला सर्व सूळ दाखविले. बादशहानें विचारलें : 'ह्यांत एक चांदीचा व एक सोन्याचा सूळ कशासाठीं ?' बिरबलानें हळू च उत्तर दिलें कीं 'चांदीचा माझ्यासाठीं व सोन्याचा आपणांसाठीं' कारण आपण दोघे हि कोणाचे तरी जांवई आहोंत च !'

## आसक्ति सोडा

त्या च प्रमाणें जे लोक मालकांचा द्वेष करतात, ते स्वत: स्वामित्व अिच्छितात. मालक आपल्या मोठमोठ्या इस्टेटी सोडायला तयार नाहींत, तर हे लोक आपले लहान-सहान मालकी-हक्क सोडायला तयार नाहींत. लहान मालक मोठ्या मालकांचा द्वेष करतात, पण आपल्या लहान-सहान मालकीहक्कांना कवटाळून बसतात. म्हणून मोठ्या लोकांना हि आपल्या मालकीहक्कांना चिकटून राहण्याची इच्छा होते. त्यांच्या हें ध्यानांत येत नाहीं कीं ज्यासाठीं आपण मोठ्यांचा द्वेष करतों ती च गोष्ट आपण स्वत: करीत आहोंत. एकाला लंगोटीची आसक्ति आहे तर दुसऱ्याला धोतराची आहे. एकाला आपल्या बंगल्याबद्दल ममत्व आहे तर दुसऱ्याला त्याच्या झोंपडीबद्दल ! म्हणून मी म्हणतों कीं सर्व लहान लोकांनीं आपआपल्या मालकीची आसक्ति सोडावी, तेव्हां च मोठ्यांची आसक्ति सुटेल. केवळ एकमेकांचा मत्सर करण्याचा कार्यक्रम चालू राहिला तर त्यानें शक्ति वाढणार नाहीं.

## श्रीमंतांची सेवा कोणती ?

सर्व-सेवा-संघाचा सिद्धांत आहे कीं 'सर्व सेवा' करायची. मालक-मजूर, गरीब-श्रीमंत, सर्वांची सेवा करायची. दोघां-

मधें संघर्ष असतां कामा नये. लोक विचारतात, 'श्रीमंतांची सेवा तुम्ही कशी करणार ?' त्यांची सेवा त्यांना संपत्तीपासून मुक्त करण्यानें होईल.

एक कमजोर किडकिड्या मनुष्य होता. शरीर वाळून गेलेलें ! तो डॉक्टरकडे गेला. डॉक्टरनें त्याला स्वत:जवळ ठेवलें आणि औषधाच्या नांवानें तो त्याला कांहीं तरी पाजीत राहिला. कारण कांहीं तरी पाजल्याशिवाय डॉक्टरवर हल्लीं लोक विश्वास ठेवीत नाहींत. औषधाबरोबर च तो त्याला लाडू खायला देऊं लागला. दूध तूप हि देऊं लागला.

डॉक्टरची कीर्ति सर्वत्र पसरली कीं हा डॉक्टर लाडू खायला घालून रोग बरा करतो. हें ऐकून एक दुसरा रोगी त्या डॉक्टरकडे गेला. त्याला आपल्या शरीराचें ओझें वाहणें कठिण झालें होतें. तो धांपा टाकीत होता. डॉक्टरनें त्याला हि आपल्या घरांत ठेऊन औषधोपचार सुरू केला. डॉक्टर म्हणाले कीं, 'एक पथ्य निश्चयपूर्वक सांभाळशील तर तू बरा होशील.' रोगी म्हणाला, 'तुम्ही माझे जीवनदाते आहांत, तुम्ही म्हणाल तसें वागायला मला मुळीं च हरकत नाहीं'. डॉक्टर म्हणाला, 'तूप, साखर आणि कणिक या तिन्ही वस्तु तुला वर्ज्य आहेत. तूं फक्त भाज्या खात जा'. तो मनुष्य रागावला, म्हणाला, 'फक्त भाजीपाला खायला काय मी म्हैस आहे ?' त्या दुसऱ्या माणसाला तुम्ही लाडू खायला देतां. मला कां देत नाहीं ? मी तर मोठ्या आशेनें आलों होतों'. डॉक्टर म्हणाला, 'मी तुम्हा दोघांचा हि मित्र आहें, म्हणून तुला विचारतों कीं तुला जगायचें आहे कीं मरायचें आहे ? जगायचें असेल तर पन्नास पौंड वजन तुला कमी करायला हवें. नाहीं तर

आपल्या वजनासह मरून जाशील.' अशक्त असेल त्याला खायला घालणें हें त्याच्यावर प्रेम करणें होय. ज्याचें वजन फार वाढलें आहे त्याचें वजन कमी करणें हें हि त्याच्यावर प्रेम करणें च होय.

## प्रेमानें लुटा

म्हणून मी म्हणतों, 'श्रीमंतांवर प्रेम करा'. तर कम्युनिस्ट म्हणतात 'त्यांचा द्वेष करा'. मी म्हणतों यांचें तूप, साखर, रोटी बंद करणें हें प्रेम आहे. 'प्रेमाला' तुम्ही 'द्वेष' कां म्हणतां? *बाबामधें व तुमच्यामधें हा च फरक आहे. बाबा घरोघर जातो आणि दिवसा लुटतो. ज्याला लुटतो तो बाबाला मानपत्र देतो. आजपर्यंत बाबाला पांच लाख दानपत्रें मिळालीं आणि मानपत्रें हि पुष्कळ मिळालीं. ज्यांनीं दान दिलें त्यांना च वास्तविक मानपत्र मिळायला हवें. पण येथें उलटें च घडून येतें. कारण बाबानें त्यांचें फाजील असलेलें वजन कमी केलें. पांचशें एकरांपैकीं शंभर एकर च ठेवलें! आतां ते आणखी कांहीं काळ जगू शकतील. लोक त्यांना आशीर्वाद देतील. म्हणून मला हीं मानपत्रें मिळतात. नुकते च एका गांवांत एक कम्युनिस्ट मित्र माझ्याकडे आले. त्यांनीं माझें व्याख्यान ऐकलें. ते म्हणाले, "आम्ही असें व्याख्यान देऊं तर सरकार आम्हांला तुरुंगांत टाकील." मीं म्हटलें "हा च तर तुमच्या माझ्यांत फरक आहे. तुम्ही रात्रीं लुटालूट कां करतां? बाबाची युक्ति पहा. श्रीमंतांवर प्रेम करा. प्रेमानें त्यांचें वजन कमी करा.

## भावाभावांचें आलिंगन

साडेचार वर्षांपूर्वीं मी तेलंगणांत फिरत होतों, तेव्हां पाहिलें कीं सरकारी शिपाई लोकांना खूप लुटीत आहेत. ते त्यांना

* [बाबा म्हणजे विनोबा]

म्हणत, 'तुम्ही कम्युनिस्टांना मदत करतां म्हणून तुरुंगांत चला." बिचारे दोन्ही बाजूंनीं भरडले जात होते. रात्रीं कम्युनिस्ट त्यांना धमक्या देत आणि दिवसा सरकारी शिपाई छळीत.

एके ठिकाणीं आम्हांला दोन भाऊ भेटले. ते एकमेकांचा द्वेष करीत. एक होता कॉंग्रेसवाला, दुसरा होता कम्युनिस्ट. अर्धी जमीन एकाजवळ, अर्धी दुसऱ्याजवळ. दोघे हि जमीनदार होते. मीं दोघांना हि समजावलें. त्यांची समजूत पटली. दोघांनीं एकमेकांच्या हातांत हात घातला आणि सर्वांसमक्ष कबूल केलें कीं आजपासून आम्ही एकमेकांवर प्रेम करूं. दोघांनीं हि भूदान दिलें. त्यांच्यापैकीं जो कंजूष म्हणून प्रसिद्ध होता, त्यानें हि दान दिलें. मग त्यांच्या मित्रांनीं हि दान दिलें. मीं कम्युनिस्टांना म्हटलें, "मी दिवसा लुटतों. तुम्ही रात्रीं लुटता. लुटायला कां भितां ? चोरी करायला कां भितां ? तुम्ही कांहीं स्वतःसाठीं चोरी करीत नाहीं. भगवान् कृष्ण दुसऱ्यासाठीं चोरी करी. भागवतामध्ये कृष्णाच्या चोरीचें वर्णन आहे. आणि पांच हजार वर्षांपासून लोक मोठ्या प्रेमानें तें वाचीत आले आहेत. कृष्णानें खूप लोणी खाल्लें म्हणून तो धष्ट-पुष्ट बनला. आणि कंसाशीं युद्ध करूं शकला. यशोदेनें त्याला विचारलें की तूं लोणी कां खातोस ? तर म्हणतो 'मग काय शेण खायचें ? मी कांहीं एकटा खात नाहीं, मी स्वतःसाठीं चोरी करीत नाहीं'. दुसऱ्याकरितां केलेल्या चोरीची देखील प्रशंसा होते. म्हणून म्हणतों कीं आपण जर दिवसा लुटूं शकतों तर रात्रीं लुटायची काय गरज ? प्रेमानें दिवसा लुटतां येणें ही एक कला आहे. आणि जें काम कलेनें होतें तें प्रेमानें हि होत नाहीं. म्हणून च बाबा सांगतों कीं कलेनें काम घ्या.

### साम्ययोगाचा अर्थ

बाबा जमीन घेऊन काय करणार आहे ? तो काय नुसती जमीन गोळा करणार आहे ? नाहीं, बाबाला जमिनीची मालकी नष्ट करावयाची आहे. जशी पाण्यावर कोणाची मालकी असूं शकत नाहीं, हवेवर कोणाची मालकी असूं शकत नाहीं, सूर्य प्रकाशावर कोणाची मालकी असूं शकत नाहीं, तशी जमिनीवर हि कोणाची मालकी असूं शकत नाहीं. गांवोगांव, घरोघर, जाऊन बाबा हें च सांगत असतो. लोक अैकतात आणि दान देतात. लोभामुळें कांहीं लोक जमीन द्यायला इन्कार हि करतात, परंतु 'तुमचें म्हणणें चुकीचें आहे' असें म्हणणारा कोणी मला आढळला नाहीं. माझा असा दावा आहे कीं मी गरीबांवर प्रेम करतों आणि श्रीमंतांवर हि प्रेम करतों. तुलसीदासजींनीं म्हटलें आहे कीं 'रामाच्या प्रेमाची ही च रीत आहे कीं तो मोठ्यांचा मोठेपणा आणि लहानांचा लहानपणा दूर करतो'. म्हणून ही कांहीं नवीन गोष्ट मी सांगत नाहीं. खालच्या लोकांना वर उठवावयाचें आहे आणि वरच्या लोकांना खालीं आणावयाचें आहे. दोघांची समान पातळी करायची आहे. हिन्दुस्थानच्या प्रत्येक शेतकऱ्याला बाबाची ही गोष्ट समजते. शेतामधें कोठें उंचवटे आणि कोठें खड्डे असें असेल, तर पीक कसें येईल ? म्हणून शेतकरी जमीन समान करतो. याला च 'साम्ययोग' म्हणतात. पण हे लोक त्याला 'साम्यवाद' म्हणतात. 'वादा' मधें प्रतिकार येतो 'योगा' मधें प्रतिकार असत नाहीं. प्रत्येक व्यक्तीनें आपली शक्ति समाजाला अर्पण करावयाची व समाजाकडून जें मिळेल तें प्रसाद म्हणून ग्रहण करायचें. हा साम्ययोगाचा अर्थ आहे.

## सर्वोदयाचे आधार

आतां आपण सर्वोदयाच्या आधारांकडे वळूं. जन्मतः मनुष्याचा तीन वस्तूंशीं संबंध येतो. एक त्याचें शरीर. याच्या आधारावर त्याचें सारें जीवन चालतें. याला च तो आपलें व्यक्तित्व म्हणतो. शरीराबरोबर च मन, बुद्धि व इंद्रियें असतात. हें मनुष्याचें बाह्य रूप आहे. याशिवाय त्याचा संबंध समाजाशीं येतो. यामध्यें च त्याच्या आई-बापांचा समावेश होतो. त्यांच्याशीं त्याचा संबंध स्वाभाविकपणें येतो. अशा रीतीनें मनुष्याचा संबंध एका बाजूनें शरीराशीं व दुसऱ्या बाजूनें समाजाशीं येतो. शरीर आणि मन मी वेगळें करीत नाहीं. शरीर सृष्टीचा अंश आहे म्हणून त्याची गणना मी सृष्टींत च करतों. यांशिवाय हल्लीं एक नवीन च वस्तु निर्माण झाली आहे. ती म्हणजे सरकार. म्हणजे मनुष्याचा संबंध मन, समाज, सृष्टि आणि सरकार यांच्याशीं येतो.

सरकार ही स्वाभाविक वस्तु नाहीं, कृत्रिम आहे. पण आज परिस्थिति अशी झाली आहे कीं मनुष्याचा जन्म होतां च त्याच्यावर सरकारचें नियंत्रण सुरू होतें. सरकारची शक्ति इतकी व्यापक झाली आहे कीं जीवनाच्या सर्व अंगाशीं तिचा संबध येतो. जन्मापासून तों मृत्यूपर्यंत सरकारचा संबंध येत च राहतो. म्हणून जरी ही वस्तु कृत्रिम असली तरी तिच्या संबंधीं विचार करणें आवश्यक आहे. या चार वस्तूंच्या आधारावर सारें जीवन उभें आहे.

: १ :

# मन

## अध्यात्म-विद्या

मनुष्याला मन असतें त्यांत अनेक प्रकारचे विकार आणि वासना असतात. कांहीं प्रमाणांत त्या वासना पुऱ्या करायला हव्या. पण त्या किती प्रमाणांत पुऱ्या करायच्या याचा विचार करावा लागतो. मनुष्याला भूक लागते, खाण्याची इच्छा होते. पण अधिक खाल्लें तर तो आजारी पडतो. खाण्याची वासना पुरी व्हावी पण प्रमाणाबाहेर खाऊं नये. विकार व जीभ ताब्यांत ठेवायला हवी. याला च मी अध्यात्म-विद्या म्हणतों.

याचा अर्थ असा कीं मनुष्यामधें समत्व असावें. त्यानें भोग भोगावे, पण अति भोगूं नये. वासना ठेवाव्या पण त्या हि अति नकोत. अशा मध्यम अवस्थेंत राहण्याला 'योग' म्हणतात. ज्या समाजांतील व्यक्तींना हा योग साधतो तो समाज सुखी होतो. म्हणून सर्वोदय समाजाच्या शिक्षणांत अध्यात्म-विद्येला प्रथम स्थान आहे.

आपण स्थितप्रज्ञाच्या लक्षणांचा रोज पाठ करतों. त्यामधें काय आहे ? जो आपल्या इंद्रियांवर अंकुश ठेवतो तो च स्थितप्रज्ञ. ज्याप्रमाणें कासव संकटाच्या वेळीं आपलीं इंद्रियें आंत खेंचतो, आणि संकट दूर झालें कीं त्यांना मोकळें सोडतो, त्याप्रमाणें करावें. ही कांहीं असाधारण शक्ति आहे असें नाहीं. लहानपणापासून तसें शिक्षण मिळाल्यास ही गोष्ट मनुष्याच्या अंगवळणी पडेल.

थंडी वाजली कीं उष्णतेची गरज भासते. 'आगीजवळ बस' असें कोणाला सांगावें लागत नाहीं. पण जळून जाण्याइतके जवळ बसतां कामा नये. थोडें दूर बसलें तर थंडीपासून बचाव होईल. फार जवळ बसलें तर हात भाजेल. फार दूर बसण्यांत लाभ नाहीं. फार जवळ बसण्यांत नुकसान आहे. थंडीपासून बचाव होण्यासाठीं आगीच्या किती जवळ बसावें हें कोणाला सांगावें लागत नाहीं. ती कांहीं इतकी मोठी बाब नाहीं, म्हणजे कृत्रिम नाहीं, कीं जी अंगीं बाणायला फार प्रयत्न करावे लागतील.

जेथें समाजरचना कृत्रिम असते तेथें आईबाप आपल्या मुलांना वाईट शिक्षण देतात. मिरची खाण्याची उपजत आवड असलेलें मूल एक हि आढळणार नाहीं. मधुर रस सर्व च मुलांना आवडतो. तिखट आणि खारट मुलांना आवडत नाहीं. गीतेची अशी शिकवण आहे कीं तिखट, खारट खाऊं नका. मधुर रसाचें सेवन करा. परंतु आईबाप मुलांना तिखट, खारट खाण्याची संवय लावतात. मुलाला जरा तिखट लागलें तर तो चटकन् 'नको' म्हणतो. मग आईबाप समजावतात कीं थोडें थोडें खात जा. अशानें संवयी उलट्या लागतात. पुढें पुढें तर मुलाला तिखटामिठाशिवाय जेवण च आवडेनासें होतें. मग गीतेची शिकवण अवघड वाटते. हा दृष्टांत एवढ्यासाठीं च दिला कीं गीतेची शिकवण अवघड नाहीं हे ध्यानीं यावें. पण कुशिक्षणानें कुसंस्कार पडतात म्हणून आपणास ती शिकवण अवघड वाटूं लागते.

**तम्बाखू : आंध्राकू**

आंध्रमधें मीं पाहिलें कीं लहान लहान मुलांना विड्या ओढण्याची संवय लावतात. येथील उत्कृष्ट जमिनींत तंबाखू

मन २८७३६ दि: ... नों: दि: ...

पिकवतात. एवढें च काय, पण आमच्या स्वागताला येतांना हि लोकांच्या तोंडांत बिड्या असतात. हें वाईट व्यसन आहे याचें त्यांना भान च नसतें. कारण आईबाप त्यांना तसें च वळण लावतात. आंध्रमधें मला तंबाखूची इतकी शेतें आढळलीं कीं मी आंध्रला शेंवटीं 'आंध्राकू' हेंच नांव दिलें. कारण येथील लोकांना तंबाखूंतून च जीवनरस मिळतो. बिडी ओढण्याची स्वाभाविक प्रवृत्ति कोणाला हि नसते. तिची घाण येते. नाकांत धूर जातो. मनुष्य गुदमरतो. सुवासिक फूल दिसलें कीं तें घेण्यासाठीं लहान मूल स्वाभाविकपणें हात पुढें करतें. तंबाखूला कांहीं असा सुगंध नाहीं कीं मुलानें चट्‌दिशी हात पुढें करावा ! पण त्याचें व्यसन लागतें. आणि त्याच्याशिवाय करमेनासें होतें. कांहीं कांहीं माणसें तर अशी आढळतात कीं त्यांना विशेष चिंतन करायचें असलें, कीं लगे च सिगरेट पेटवितात. या अग्नि-ज्योतीच्या प्रकाशांत मग त्यांचें चिंतन सुरू होतें.

## इंद्रियांचें नियमन

व्यसन सोडणें कठिण असतें. वाईट संवयीमुळें संयम राखणें जड वाटतें. वस्तुत: संयम फार सोपा आहे. जें कांसवाला कळतें तें माणसाला कां कळूं नये ? संकट असेल तेथें इंद्रियें आवरावीं. संकट नसेल तेथें मोकळीं सोडावीं, हें कांसवाला समजतें. जेवढी भूक असेल तेवढें खावें. तहान लागली कीं पाणी प्यावें. जास्त खाऊं नये. जास्त झोपूं नये व कमी हि झोपूं नये; ह्या गोष्टी समजायला काय जड आहेत ? यासाठीं विशेष अभ्यास कशाला हवा ? पण कुशिक्षणामुळें ही महान तपस्या आहे असें वाटूं लागतें. यामुळें च संयमाची विद्या अवघड वाटते. परंतु सर्वोदयाचें मुख्य शिक्षण च हें कीं आपलें मन ताब्यांत ठेवावें. इंद्रियांवर ताबा ठेवावा.

आंध्रमधें मी लोकांना मौन-प्रार्थना करायला सांगतों तेव्हां ते अत्यंत शांततापूर्वक मौन-प्रार्थना करतात. ही फार मोठी शक्ति आहे असें माझें मत आहे. यामधें संयमाची फार मोठी शक्ति आहे. शिक्षणांत या वस्तूला स्थान असलें पाहिजे. असें झालें म्हणजे संयम कठिण वाटणार नाहीं आणि मनुष्याची उन्नति होईल. याला च 'अध्यात्मविद्या' म्हणतात. तिच्यामुळें मनावर व इंद्रियांवर अंकुश ठेवला जातो. येथें वासना मारण्याची गोष्ट नाहीं. त्यांचा परिमित व योग्य उपयोग करण्याची गोष्ट आहे. घोडेस्वारानें लगाम हातांत ठेवला कीं घोडा उत्तम काम करतो. तशीं च आमचीं इंद्रियें उत्तम काम करतील. ती आमची मोठी शक्ति आहे. त्यांना ताब्यांत ठेवण्याचें शिक्षण प्राप्त करून घेणें हें मानवाचें पहिलें कार्य आहे.

## : २ :

# समाज

**हितांमधें विरोध नाहीं :**

मनुष्याचें दुसरे कार्य समाजाबाबत आहे. समाजांत अनेक व्यक्ति असतात. त्यांच्यामधें विरोध येणार नाहीं अशी समाज-रचना करायला हवी. एकाच्या खऱ्या हिताचा दुसऱ्याच्या खऱ्या हिताशीं विरोध येऊं च शकत नाहीं. हें सोपें आहे, यांत कांहीं कठिण नाहीं. आपण समाजांत राहतों ते एकमेकांसाठीं राहतों म्हणून आम्हांला एकमेकांच्या हिताकडे पाहिलें पाहिजे. हितांमधें संघर्ष आला तर समाजाचें हित होणार नाहीं. एक मनुष्य विद्वान

झाला तर त्यानें साऱ्या समाजाचा फायदा होतो. नुकसान कोणाचें च होत नाहीं. एखाद्याचें आरोग्य चांगलें असलें तर त्यांत नुकसान कोणाचें च होत नाहीं. अशा रीतीनें विचार केला, तर एकाच्या हितांत दुसऱ्याचें हि हित आहे, हें ध्यानांत येईल. पण आज कृत्रिम समाजशास्त्र पुढें आलें आहे. तें म्हणतें परस्परांच्या हितांत विरोध असतो. ज्याप्रमाणें कुशिक्षणानें वाईट संवयी लागल्या त्या च प्रमाणें चुकीच्या समाजशास्त्रानें परस्पर हित-विरोध निर्माण झाला आहे. त्यामुळें सर्वांच्या हिताचें रक्षण करणें कठिण झालें आहे.

**विरोधी संघांचा जन्म :**

सध्यां भाषावार प्रांत-रचना होत आहे. निरनिराळ्या प्रांतांच्या लोकांना वाटतें कीं एकाचें हित दुसऱ्याच्या हिताच्या विरुद्ध आहे. आश्चर्याची गोष्ट ही कीं एका प्रांतांतल्या एकूण एक लोकांचें या बाबतींत एकमत असतें. तर दुसऱ्या प्रांतांतल्या एकूण एक लोकांचें मत याविरुद्ध असतें. असें कां होतें ? याचें कारण हें च कीं समाजशास्त्रानें परस्पर हित-विरोधाची शिकवण आम्हांला दिली आहे. हितसंरक्षणासाठीं वेगवेगळे संघ बनविण्यांत येतात. अखिल-भारतीय-विद्यार्थी-संघ कशासाठीं निघाला ? तर विद्यार्थी समजतात कीं शिक्षकांच्या हिताविरुद्ध आपलें हित आहे. आणि आपल्या हित-रक्षणासाठीं संघाची गरज आहे. विद्यार्थ्यांचे हिताविरुद्ध शिक्षकांचें हित आणि शिक्षकांच्या हिताविरुद्ध विद्यार्थ्यांचें हित ! आतां एक च काय ती उणीव राहिली ! 'अखिल भारतीय पिता-संघ' आणि 'अखिल भारतीय पुत्र-संघ' तेवढे बनले म्हणजे संघटना पूर्ण झाली !.

**पत्नीविरुद्ध पति :**

इंग्लंडांत पूर्वी स्त्रियांना मताधिकार नव्हता. तेथें पुरुषांचें हित स्त्रियांच्या हिताविरुद्ध व स्त्रियांचें हित पुरुषांच्या हिताविरुद्ध अशी परिस्थिति होती. पतींविरुद्ध पत्न्यांचा 'क्लास स्ट्रगल' (वर्ग-कलह) सुरू झाला.' पत्न्यां'ना-आपल्या हक्कांसाठी पतींविरुद्ध लढा द्यावा लागला. पार्लमेंटांत जाऊन अंडीं फेकफेकून पुरुषांना बेजार करावें लागलें. शेंवटीं पतिदेवाला पत्नीची गोष्ट कबूल करावी लागली, आणि मताधिकार द्यावा लागला. आपल्या देशांत अशा तऱ्हेचा भेद प्रकट झाला नाहीं. आपल्या आई-बापांत अशी लढाई होईल ही कल्पना च आपण करूं शकत नाहीं. पण तिकडे अशा तऱ्हेची समस्या उभी राहिली व स्त्रियांना लढावें लागले. अशा तऱ्हेच्या हितविरोधाच्या कल्पनेंतून कृत्रिम समाजशास्त्र निर्माण झालें.

**आंकड्यांचे महत्त्व**

हा विरोध दूर करण्यासाठीं राजनीतिशास्त्र बनलें. तें सांगतें कीं सारा कारभार बहुमतानें चालवावा. त्यानें मतें मोजायला सुरवात केली. ५१ अनुकूल आणि ४९ प्रतिकूल असले तर ५१ च्या मताप्रमाणें कारभार चालावा. मीं तर असें हि पाहिलें कीं एके ठिकाणीं खुनाच्या केसमधें पांचापैकीं तीन न्यायाधिशांनीं सांगितलें कीं "आरोपी दोषी आहे, त्याला फांशी द्यावें." दुसऱ्या दोघांनीं सांगितलें कीं "तो निर्दोष आहे." परंतु तिघांचें बहुमत झालें म्हणून आरोपीला फांशी देण्यांत आलें. अशा रीतीनें बहुमताच्या आधारावर सर्व कारभार चालावा व अल्पमतानें बहुमताच्या इच्छेनुसार चालावें; अशी नीति सुरू झाली.

**अग्राह्य विचार :**

आजकाल 'विशाल' बनण्याची चर्चा चालू आहे. आपणांला विशाल आंध्र हवा असेल, तर आपलीं हृदयें विशाल बनवा. परंतु हे लोक म्हणतात, राज्यघटनेंत दर प्रांतानें १० प्रतिनिधि पार्लमेंटांत पाठवावे असें असलें आणि विशालांध्र एक च प्रांत बनला तर आमचे फक्त दहा च प्रतिनिधि पार्लमेंटांत जातील. त्याऐवजीं तीन प्रांत बनलेले चांगले. समुद्रकांठची तंबाखू संस्कृति, तेलंगणाची मदिरा-संस्कृति आणि रायलसीमेची ज्वारी-संस्कृति; अशा तीन संस्कृतींचे तीन प्रांत झाले तर पार्लमेंटांत तीस प्रतिनिधि जाऊं शकतील. मग उत्तर प्रदेशच्या लोकांची अशी धडपड सुरू होईल कीं आपल्या विशाल प्रांताचे हि चार तुकडे व्हावेत. एक प्रांत झाला तर दहा च लोक जातील, चार प्रांत झाले तर चाळीस लोक जातील. हा निव्वळ पोरखेळ आहे. यांत जनहिताचा प्रश्न च नाहीं. बहुमताचा जो विचार पश्चिमच्या लोकांनीं शोधून काढला तो येथें आला. आमची बुद्धि पराजित झाली. इथें इंग्रजांचें राज्य होतें म्हणून त्यांचा बहुमताचा विचार आम्हीं घेतला. माझें असें म्हणणें नाहीं कीं पश्चिमच्या चांगल्या गोष्टींचें अनुकरण करूं नये. पश्चिमेकडे चांगल्या गोष्टी नाहींत असें हि माझें म्हणणें नाहीं. परंतु ही जी अक्कल आम्ही तिकडून घेतली ती मात्र घेण्याजोगी नाहीं.

**निवडणुकीचा विष-वृक्ष :**

ओरिसामधें कोरापुट जिल्ह्यांत ६०० ग्रामदानें मिळालीं. त्या गांवांनीं आपली संपूर्ण जमीन दान केली. ज्याच्या जवळ पंचवीस एकर जमीन होती त्याला पांच च एकर मिळाली आणि त्यानें ती खुषीनें स्वीकारली. हिशेबाप्रमाणें ज्याच्या वांट्याला जेवढी जमीन

आली तेवढी त्यानें घेतली. कारण त्यांना ही गोष्ट समजावून देण्यांत आली कीं जमीन सगळ्यांची आहे. हितांमधें कांहीं विरोध नाहीं. त्या लोकांना आधुनिक समाजशास्त्र आणि आधुनिक अर्थ-शास्त्र माहीत च नाहीं. परंतु ओरिसांत गोपबाबूंसमोर आज एक नवा प्रश्न आहे. निवडणुकी जवळ आल्या आहेत. वेगवेगळ्या पक्षांचे लोक गांवांत येतील आणि मतें मागतील. समजा कीं एका गांवानें एका पक्षाला मत दिलें आणि दुसऱ्या गांवानें दुसऱ्या पक्षाला मत दिलें, तर त्या दोन गांवांमधें विरोध निर्माण होईल. पार्टीवाले लोक ग्रामहिताचा आणि जनहिताचा विचार च करीत नाहींत.

या ज्या निवडणुकी होतात यांचा वेगळा च धर्म-विचार असतो. त्यांचे तीन सिद्धांत आहेत. आत्मस्तुति, परनिंदा आणि मिथ्या-भाषण. गांवांमधें जर निवडणुकांमुळें फूट पडली तर केलेलें सर्व कार्य धुळीस मिळेल. आग लावणे सोपें असतें, पण विझवणें फार कठिण असतें. भागवतांत कथा आहे कीं गोकुळाला आग लागली तेव्हां भगवंतानें ती सर्व गिळून टाकली. येथें आग लावणारे भरपूर आहेत. ते निवडणुकीच्या कामासाठीं गांवोगांव जातील आणि आगी लावतील. मागाहून त्या गांवांत काय होईल याचा विचार ते करणार नाहींत. यापासून गांवाचें रक्षण कसें करावें ही ग्रामसेवा करणारांसमोर आज एक समस्या आहे. हा जो विषवृक्ष आणून लावला गेला आहे त्यापासून कसें सुटायचें ?

**पांचामुखी परमेश्वर :**

आपल्याकडे यावर तोड होती. आपण 'पांचामुखीं परमेश्वर' असें म्हणत असूं. कोणत्या हि गोष्टींत पांच पंचांचें एकमत झालें पाहिजे. त्यांच्या एकमतानें च कारभार चाले. आतां नवें समाज-

शास्त्र आलें. तें म्हणतें 'चार बोले परमेश्वर' 'तीन बोले परमेश्वर'. चार विरुद्ध एक ठराव पास. तीन विरुद्ध दोन आहे ना ? आहेत. तर ठराव पास. हा जो प्रकार चालू आहे त्यानें जगाला आग लावली आहे.

**नवी समाज-रचना :**

आपल्याला एक नवी समाज-रचना करावयाची आहे. तिच्या मधें मुख्य विचार हा कीं एकमेकांच्या हितांत विरोध नसतो. ही रचना कठिण नाहीं. पण आजवर चुकीच्या गोष्टीवर विश्वास ठेवल्यामुळें ही साधीसुधी गोष्ट च अवघड वाटूं लागली. कोरापुट जिल्ह्यांतील अशिक्षित लोकांना हि कळतें कीं एकमेकांच्या हितांत विरोध नाहीं. अगदीं सरळ सोपी गोष्ट. पण आज ती च वांकडी वाटते. हा जो अल्प-संख्येचा आणि बहुसंख्येचा विचार आहे त्याचे फार भयंकर परिणाम होत आहेत. यांत कोटचवधि रुपये खर्च होतात. इथें गरिबांना वाव च नाहीं. जातिभेद तर इतका वाढला आहे कीं कम्युनिस्टांत आतांपर्यंत नसलेली ही वस्तु त्यांच्यांत शिरली आहे. त्यांनीं निराळ्या प्रकारचा भेद ( श्रीमंत-गरीब ) मानला आहे. तेवढ्यानें त्यांचें काम चालतें. मला कोणीं सांगितलें कीं 'कामा' व 'रेड्डी' मिळून' च 'कामरेड' होतो. परंतु कम्युनिस्टांमधें हि 'कामा' व 'रेड्डी' एकमेकांविरुद्ध आहेत. ज्या जातिभेदावर राजा राममोहन रायपासून गांधींपर्यंत सर्वांनीं प्रहार केला आणि जो मरायच्या पंथाला लागला होता, तो च या निवडणुकीमुळें, वाढूं लागला आहे. हें डेमॉक्रसी (लोकतंत्रा) चें वरदान आहे ! ! म्हणून आपल्याला नव्या पद्धतीची रचना केली पाहिजे. नवें समाजशास्त्र तयार केलें पाहिजे. जसें शिक्षणशास्त्र असतें तसें समाजशास्त्र बनतें; म्हणून शिक्षणशास्त्रांत हि परिवर्तन केलें पाहिजे.

: ३ :

# सृष्टि

मानवाचा सृष्टीशीं कोणत्या प्रकारचा संबंध असावा ? कांहीं लोक मानतात कीं मानवाला सृष्टीशीं संघर्ष करावा लागतो. हे लोक संघर्षवादी आहेत. ते म्हणतात कीं मनुष्यां-मनुष्यांमधें संघर्ष होईल तेव्हांच सुव्यवस्था निर्माण होईल, त्यांतून नवनिर्माण होईल; विपुलता, प्राचुर्य, समृद्धि, येईल आणि नंतर राज्यव्यवस्था गळून पडेल, संघर्ष नाहींसा होईल. संघर्षवादी पुढें म्हणतात कीं मानवां-मानवांमधील संघर्ष संपला म्हणजे मानवाचा सृष्टीशीं जोरदार संघर्ष सुरू होईल. आतां विचार करा कीं सृष्टि केव्हां निर्माण झाली, मनुष्य केव्हां निर्माण झाला आणि कोठून निर्माण झाला हें सांगणें हि अशक्य आहे. सृष्टि अनादि व अनंत आहे. रात्रीं किती तरी तारे चमकतांना आपण पाहतों. सृष्टि इतकी विशाल आहे कीं ती कधीं निर्माण झाली हा प्रश्न च उद्भवत नाहीं. परंतु आपली ही पृथ्वी सुमारे दोनशें कोटि वर्षांपूर्वी निर्माण झाली, आणि मानवाची उत्पत्ति फार तर पन्नास लाख वर्षांपूर्वी झाली, असें मानतां येईल. आतां मानव इतका आधुनिक आणि सृष्टि इतकी प्राचीन ! हा मानव सृष्टीशीं काय संघर्ष करणार ? मुलाचा का आईशीं संघर्ष असतो ?

**संघर्षाचा प्रश्न च नाहीं :**

आई मुलाला प्रेमानें स्तनपान करविते आणि मूल तोंडानें दूध पितें. कोणी जर म्हणूं लागला कीं मूल स्तनाशीं संघर्ष करीत आहे, तर या म्हणण्यांत मला बुद्धि दिसत नाहीं. आपण सृष्टीची

सेवा करायला हवी. सृष्टि आपल्याला दूध पाजते. आई ज्याप्रमाणें स्तनपान देऊन मुलाचें पोषण करते त्याप्रमाणें सृष्टीच्या स्तनपानानें माणसाचें पोषण होतें. आपण जमीन खणतों. त्यांतून आपल्याला जें पाणी मिळतें तें दूध च होय. त्यानें आपलें पोषण होतें. पण संघर्षवादी याला संघर्ष म्हणतात. हा शब्दभेद नसून विचारभेद आहे. तत्परिणामीं कांहीं लोक या निर्णयावर आले आहेत कीं आजची सृष्टि वाढत्या मानवसंख्येला पोसायला असमर्थ आहे. प्रत्येक मुलानें जर आईची सेवा केली तर जन्माला येणाऱ्या सर्व मुलांचे ती पोषण करू शकेल.

**दशमुखाचा जन्म :**

देशाची लोकसंख्या वाढत आहे, या गोष्टीचा लोकांना भार वाटतो हें पाहून नवल वाटतें. सेनापति कधीं तक्रार करीत नाहीं कीं माझ्या सैन्यांत शिपाई फार आहेत. एखाद्या कुटुंबांतील मंडळी जेव्हां तक्रार करतात कीं "आमची मोठी दुर्दशा आहे. कमावणारा एक च आहे आणि खाणारे दहा आहेत" तेव्हां मला मोठें आश्चर्य वाटतें. परिवारांत खाणारीं तोंडें दहा आणि कमावणारें हात फक्त दोन च असतील, तर या कुटुंबांत दशमुख रावण तर नाहीं जन्माला आला अशी मला शंका येते. घरांत दहा तोंडें आहेत तसे वीस हात आहेत कीं नाहींत? परंतु ते वीस हात काम करीत नाहींत हा दोष कोणाचा? ईश्वरी सृष्टीचा? ईश्वरानें आम्हांला हात एक आणि तोंडें दोन दिलीं असतीं तर तक्रारीला जागा होती. पण त्यानें तसें केलें नाहीं. मग तक्रार कसली?

सृष्टीला संख्येचा भार होत नसतो, पापाचा मात्र भार होतो. पापामुळें प्रजा वाढली तर भार अवश्य होईल. प्रजा पापानें

हि वाढू शकते. पुण्यानें हि वाढू शकते. पापानें ती घटू शकते, तशी पुण्यानें हि घटू शकते. प्रजा वाढो कीं घटो, पुण्य असेल तर भार होणार नाहीं. पाप असेल तर मात्र भार होईल. ब्रह्मचर्यानें प्रजा घटली तर लाभ होईल, कृत्रिम उपायांनीं घटली तर हानि होईल. पुण्यानें वाढली तर लाभ होईल, स्वैराचारानें वाढली तर हानि होईल. माझा असा सिद्धांत आहे कीं सृष्टीमधें जेवढे प्राणी आणि जंतु आहेत त्यांच्या पोषणाची व्यवस्था सृष्टीमधें आहे च. अट इतकी च कीं सृष्टीच्या सेवेसाठीं भगवंतानें आम्हांला जे दोन हात दिले आहेत त्यांचा पूर्ण उपयोग आपण करायला हवा.

**अनीतिमय उपाय**

हल्लीं कृत्रिमतेनें ' कुटुंब-नियोजन करण्याच्या गोष्टी निर्लज्जपणें बोलल्या जात आहेत. लोक विचार करीत नाहींत कीं त्यांमुळें अनीतीचा किती प्रचार होईल, आत्मसंयमशक्तीचा किती ऱ्हास होईल, सारें जीवन किती पराक्रमशून्य होईल ! या सर्व लोकांचा एक ऋषि होऊन गेला. त्याचें नांव ' माल्थस. ' त्याचा असा सिद्धांत आहे कीं प्रजा जास्त वाढली तर जमीन तिचें पोषण करूं शकत नाहीं. असें आहे तर मग ॲटम आणि हायड्रोजन बॉंब तयार होऊं लागले म्हणून रडतां कां ? छान च झालें, तेवढे लोक मरतील. थोडे लोक च शिल्लक राहतील. मग दु:ख कां करतां ? खरी गोष्ट अशी कीं आपल्याला पराक्रमशील कर्मशील बनलें पाहिजे; परिशोधक वृत्ति ठेवली पाहिजे. त्यासाठीं विज्ञान वाढवणें जरूर असेल तर अवश्य वाढवा. सृष्टीमधें विज्ञान जितकें वाढेल तितकी सृष्टि अधिक समृद्ध होईल. म्हणून विज्ञानाचा खूप उत्कर्ष व्हावा असें माझें म्हणणें आहे.

क्रा. क्र. ९९८४०५ २१

कांहीं लोकांना वाटतें कीं बाकीचें विज्ञान नको, त्यांना फक्त चरख्याचा प्रचार हवा आहे. पण त्यांची ही समजूत चुकीची आहे. मला चरखा हि हवा आहे आणि विज्ञान हि हवें आहे. लोक म्हणतात विमानाची गति खूप वाढली आहे, पांच तासांत दिल्लीला जातां येतें. मी विचारतों तुमचें विज्ञान एवढ्यावर च कां थांबतें ? तुम्ही च म्हणतां कीं विमानांत पांच पांच तास बसून त्रास होतो. मग त्या विमानांत एवढी सुधारणा आणि व्यवस्था करा कीं तिथें व्यवस्थितपणें सूत कांततां येईल. एवढें जमलें नाहीं तर विज्ञानाचा काय उपयोग ?

## ज्ञान आणि विज्ञान

आत्मज्ञान जसें आपल्याला मदतरूप असतें तसें सृष्टीचें विज्ञान हि असतें. ज्ञान आणि विज्ञान दोहोंची आवश्यकता आहे. पक्षी दोन्ही पंखांनीं उडत असतो. मानव–जीवनाचे हे दोन पंख आहेत. मानव-समाजाची अगदीं प्रारंभापासून आत्मज्ञान आणि विज्ञान प्राप्त करण्याची धडपड चालू आहे. विज्ञान खूप वाढावें असें मला वाटतें. पण त्याबरोबर च त्याचा सदुपयोग करण्याची अक्कल आमच्यामधें असावी असें वाटतें. अग्नीचा उपयोग आपण अवश्य करावा पण तो स्वयंपाक करण्यासाठीं च करायचा असतो, लोकांच्या घरांना आगी लावण्यासाठी नव्हे. लोक म्हणतात आतां ॲटमचें युग आलें आहे आणि त्याचा उपयोग लोक-कल्याणकारी कामासाठीं होऊं शकतो. या युगांत खेड्यांचा कारभार कसा चालेल ? मी म्हणतों, आम्ही हि या युगाचा स्वाद चाखूं. अणुशक्ति विकेंद्रित करून गांवोगांवीं तिचा उपयोग करण्यांत येईल. म्हणून विज्ञानाच्या शोधाबद्दल मला आदर आहे.

## विजेचा उपयोग

मी विजेचा उपयोग करायला तयार आहें. पण ती कशा तऱ्हेनें वापरावी हा मुद्दा महत्त्वाचा आहे. मूठभर लोकांच्या हातीं आपण शक्ति दिली तर ती शोषणाचें साधन बनेल. आज हेंच चालू आहे. आणि याला माझा विरोध आहे. वीज पहिल्यानें कोठें येते ? मोठ्या शहरांत. मग खेड्यांपाड्यांत जाणार. दूरदूरच्या खेड्यांत तर ती जात च नाहीं. तिचा फायदा सर्वांना सारख्या प्रमाणांत मिळत नाहीं. तिचें भांडवल श्रीमंतापाशीं राहणार, गरिबांपाशीं नाहीं. म्हणून विजेची शक्ति गरिबांच्या उपयोगाची नाहीं. उलट ती त्यांचें शोषण करील. गरिबांना निव्वळ उजेडासाठीं वीज दिली तर लोक रात्रीं जागरण करूं लागतील, त्यांचे डोळे बिघडतील, आणि किडे त्रास देतील. म्हणजे गरिबांसाठीं विजेचा उपयोग जवळ जवळ शून्य च. कांहीं लोक म्हणतात आम्ही वीज स्वस्त करूं आणि प्रत्येकाला त्यासाठीं भांडवल देऊं. याचा अर्थ इतका च कीं पैसेवाले त्याचा उपयोग करणार. तुम्ही विजेचें साधन सर्वांना दिलें, आणि त्याचा उपयोग सार्वत्रिक होऊं शकला, तर विजेचा लाभ सर्वांना मिळेल. एवढें करणार असाल तर मी हि विजेचा उपयोग करावयाला तयार आहें. विज्ञानाचा अत्यंत उत्कर्ष व्हावा असें मी इच्छितों, कारण मी अहिंसावादी आहें हिंसावादी नाहीं.

## हिंसा आणि विज्ञान

विज्ञानाचें लग्न जर हिंसेशीं लागलें तर मानवाचा सर्वनाश होईल. म्हणून विज्ञानाशीं अहिंसेचें च लग्न व्हायला हवें. विज्ञान आणि अहिंसा यांच्या संयोगानें पृथ्वीवर स्वर्ग अवतरेल.

हिंसा आणि विज्ञान यांच्या संयोगानें मानवाचा संहार होईल. विमान निघालें म्हणून बाबा पायीं चालणें बंद करणार नाहीं. लोकांनीं आजकाल पायीं चालणें सोडून दिलें आहे. म्हणतात कीं आम्हांला वेळ वाचवायचा आहे. मी म्हणतों कीं तुम्हांला वेळ वाचवावयाचा आहे 'कीं स्वत:ला वाचवावयाचें आहे ? लोक म्हणतात आम्ही मोटारनें प्रवास करून लवकर कामें उरकूं. मग ईश्वरानें जर तुम्हांला म्हटलें कीं मी सुद्धां तुम्हांला शंभराऐवजीं पन्नास वर्षांत च उचलून नेतों तर तें तुम्हाला आवडेल काय ? जशास तसें हा ईश्वराचा कायदा आहे. म्हणून दिर्घायुषी बनायचें असेल तर रात्रीं सिनेमा पाहतां कामा नयें, शाळेंत पायीं गेलें पाहिजे, कपडे धोब्याकडून धुऊन घेतां कामा नये, आणि रात्रीं नि:स्वप्न, गाढ झोंप घेतली पाहिजे. विज्ञान वाढावें पण त्याबरोबर अहिंसा आणि अक्कल सुद्धां वाढावी. अहिंसा आणि अक्कल मिळून आत्मज्ञान होतें. म्हणून आत्मज्ञानासह विज्ञान हवें.

## अनुकरणाचें फळ

एक गृहस्थ होते. त्यांना कुठें हि जायचें असलें कीं ते सायकल-वरून जात. त्यांच्या मुलानें त्यांचें अनुकरण सुरू केलें. किती हि समजावून सांगितलें कीं पायीं चालावें, तरी तो ऐकेना. बापानें विचारलें 'देवानें पाय कशासाठीं दिले आहेत ?' मुलानें उत्तर दिलें, 'सायकल चालविण्यासाठीं'. म्हणून मी म्हणतों कीं पायीं चालणें योग्य असेल तेथें पायीं चालावें, जिथे सायकल चालवण्याची गरज पडेल तिथें सायकल चालवावी. विमानाच्या जागीं विमान आणि मोटारीच्या जागीं मोटार चालवावी.

लोक मला विचारतात, 'असे पायीं कां चालतां ?' मी म्हणतों 'मी हवेंत फिरलों तर मला हवा च मिळेल. जमिनीवर

चालतों म्हणून जमीन मिळते.' याला म्हणतात अक्कल ! लोक विचारतात, 'पायीं चालून काय होणार ?' मी म्हणतों, 'जनतेशीं संपर्क ठेवावा, तिची परिस्थिति समजावून घ्यावी म्हणून मी पायीं चालतों. लोकांचें प्रेम मी संपादन करतों, त्यामुळें जमीन मिळते. प्रेमाशिवायची जमीन मला नको'.

## साधनांचा योग्य उपयोग

कोणतें औजार कसें वापरावें हें जाणण्याची अक्कल आपल्याला हवी. उपकरणें (साधनें) करणांपेक्षां (इंद्रियांपेक्षां) वरचढ होतां कामा नयेत. इंद्रियें हीं 'करणें' आहेत व औजार 'उपकरणें' आहेत. पायांपेक्षां सायकलचें व डोळ्यांपेक्षां चष्म्याचें प्रस्थ वाढलें तर कसें चालेल ? चष्म्याचें हि महत्त्व आहे पण त्याच्या जागीं ! तुम्ही म्हणाल बाबा स्वत: लिहून वाचून पंडित बनला आणि आमचा मात्र चष्मा काढून घेत आहे ! चष्मा लावावा, न लागणें केव्हां हि चांगलें. एक होता बाप. आणि एक होता मुलगा. बाप चष्मा लावून वाची. मुलाला इच्छा झाली कीं आपण हि वाचावें. वाचतां तर येत नव्हतें, तरी हि एक दिवस बापाचा चष्मा लावून तो वाचायला बसला. त्याची अशी समजूत होती कीं साध्या डोळ्यांनीं वाचतां च येत नाहीं. तेव्हां हा विवेक, ही अक्कल, आमच्यामधें हवी, कीं कोणतें औजार कसें वापरावें.

लोक विचारतात, मी ट्रॅक्टरचा उपयोग कां करीत नाहीं ? मी म्हणतों त्यात दोन उणीवा आहेत. आपण शेतांत ज्वारी पेरली तर ज्वारी आणि कडबा दोन्ही मिळतात. तुमचा ट्रॅक्टर कडबा खात नाहीं आणि खत देत नाहीं. माझा बैल हीं दोन्हीं

कामें करतो. तुमच्या ट्रॅक्टरला मोबिल ऑइल लागतें. आणि खतासाठीं तुम्हांला सिंद्रीला शरण जावें लागतें. दुसरें असें कीं ट्रॅक्टर आपल्या देशांत तयार होत नाहीं. त्याची किंमत हि बरी च असते. अमेरिकन लोक हुशार म्हणून ट्रॅक्टर वापरतात, आम्ही मूर्ख म्हणून ट्रॅक्टर वापरतों. अमेरिकेंत दर माणशीं बारा एकर जमीन आहे. येथें जेमतेम अर्धा एकर ! नुकती च मीं पूर्व आणि पश्चिम गोदावरी जिल्ह्यांची यात्रा केली. तिथें दर चौरस मैलास पंधरा हजार लोकसंख्या आहे. अशा ठिकाणीं हातानें च शेती करायला हवी. जिथें जमीन विपुल असेल तिथें ट्रॅक्टर वापरावा आणि जमीन कमी असेल तिथें बैल वापरावा.

आणखी एक गोष्ट. अमेरिकन लोक ट्रॅक्टर वापरतात आणि असें हि म्हणतात कीं आम्ही गाय पितों आणि बैल खातों. तुम्ही बैल खायला तयार नाहीं. ट्रॅक्टर वापरायचे तर बैल खायला सुरवात करायला हवी. नाहीं तर आपत्ति ओढवेल. बैल आणि ट्रॅक्टर दोहोंसाठीं खर्च करावा लागेल. म्हणून अमेरिकेचीं औजारें आमच्या देशांत जेथें जंगल असेल तेथें च चालवितां येतील; मी ट्रॅक्टरचा द्वेषी नाहीं.

**यंत्र आमच्या अधीन असावें**

जगांत कोणतें हि यंत्र इतकें समर्थ मला वाटत नाहीं कीं मीं त्याचा द्वेष करावा. यंत्रांची काय मातबरी आहे ? एका देशाला जें यंत्र तारक असेल तें च दुसऱ्या देशाला मारक हि ठरूं शकेल. अेखाद्या देशाला एका काळीं जें यंत्र तारक तें च दुसऱ्या काळीं मारक हि होऊं शकतें. या गोष्टीचा विचार करून आपण साधनांचा उपयोग करायला हवा.

आपण अन्न खूप निर्माण करायला हवें. हें मी आधुनिक शास्त्र नाहीं सांगत. उपनिषदांत म्हटलें आहे कीं 'यया कया च विद्यया अन्नं बहु प्राप्नुयात्' कांहीं हि करून अन्न खूप पिकवा. प्लॅनिंग कमिशनवाल्यांना हा कोरा चेक आहे. कोणत्या हि उपायानें अन्न अधिक पिकवा, हा आमच्या गुरूचा मंत्र आहे. म्हणून मी यंत्राला भीत नाहीं. पण यंत्र आमच्या हातीं असावें, आम्ही यंत्राच्या आहारीं जाऊं नये.

### श्रम-विभाजन

लोकांनीं श्रम-विभाजनाचें एक तत्त्वज्ञान शोधून काढलें आहे. एक च माणूस दहा वीस कामें करील तर त्याचें कौशल्य आणि गति वाढणार नाहीं. मनुष्य जन्मभर एक च काम करीत राहील तर त्याच्या हातांत कला येईल असें ते म्हणतात. मी जेलमधें असतांना एक कुशल कारागीर माझ्याबरोबर होता. आम्हांला भाकऱ्या वजन करून मिळत. या कारागिराला सांगण्यांत आलें होतें कीं प्रत्येक भाकरी दहा तोळ्यांची हवी. हें काम तो दोन वर्षांपासून करीत आला होता. तो काय करी ? मळलेल्या पिठाचा गोळा तयार करून तराजूंत घालून तोली. पण तराजूकडे त्याला पहावें लागत नसे. कारण त्याच्या हाताला संवय होऊन गेली होती. तो तोंडानें विष्णुसहस्र-नामाचा पाठ करी. मीं त्याला विचारलें, 'तूं हा विष्णुसहस्रनामाचा पाठ कां करतोस ?' तो म्हणाला, 'मला दहा वर्षांची शिक्षा आहे. ईश्वराच्या कृपेनें त्यांत सूट मिळेल.' मीं विचारलें 'तूं तराजूकडे कां पाहत नाहींस ?' तो म्हणाला, 'माझ्या हातांना सराव झालेला आहे. पण वजन केलें पाहिजे असा कायदा आहे म्हणून वजन करतों' इतकें च.

मनुष्यानें यंत्राचे गुलाम बनूं नये हें मला म्हणायचें आहे. आम्ही यंत्राच्या तावडींत सापडलों तर जीवन नीरस होईल. एकीकडे मजुराकडून आठ आठ तास यंत्रवत् काम करून घेतात. आणि रात्रीं सिनेमा दाखवितात. म्हणतात कीं यामुळें त्यांना आनंद मिळेल. दिवसां दगदग होते त्याच्या बदल्यांत आनंदाचा हा पुरवठा ! मी म्हणतों चोवीस तास आनंद मिळवा ना! दिवसभर कष्ट सहन करणें हा आत्म्याचा धर्म नव्हे. सत् चित् आनंद हा आत्म्याचा धर्म आहे.

## सृष्टीशीं सर्वांचा च संबंध यावा

म्हणून मी म्हणतों कीं प्रत्येकाचा संबंध सृष्टीशीं असला पाहिजे. प्रत्येक मनुष्य रोज चार तास शेतींत काम करील, त्याला स्वच्छ हवा, सूर्य प्रकाश, भू-मातेच्या सेवेचा आनंद आणि पक्षांच्या संगीताचा आनंद मिळेल. त्या योगानें त्याची स्फूर्ति वाढेल. त्यामुळें ब्रह्मचर्याची साधना सोपी होईल. म्हणून कोणाला हि शेतीपासून दूर ठेवणें हा गुन्हा आहे. मंदिरांत जायला प्रतिबंध करणें हें जसें पाप आणि अधर्म आहे, तसें च मेहनत करायला शेती न देणें हें पाप आहे. शेतीमधें ईश्वर-सेवेचा आनंद मिळतो. ‘कृषिमित् कृषस्व। वित्ते रमस्व बहु मन्यमानाः’ वेदभगवानाची आज्ञा आहे कीं शेती च कर, शेती करून जें काय मिळेल तें च बहु मान. म्हणून शेती करणें हा प्रत्येकाचा धर्म आहे, ही गोष्ट नीट समजून घ्यायला हवी.

## प्रत्येकानें शेती करावी

मीं अनेक कामें आठ आठ तास केलीं आहेत. हातांत गति यावी आणि नवे शोध करतां यावें म्हणून विणायचें काम आणि इतर

हि कामें केलीं. पण मला कोणी म्हणेल कीं रोज आठ तास एक च एक काम कर, तर मी साफ नकार देईन. आठ तास बसून रहायची जबाबदारी मला मुळीं च नको. चार तास शेती व चार तास इतर काम अशी व्यवस्था हवी. माझी योजना अशी कीं प्रत्येक धंदेवाल्यानें शेती हि करावी. धंदा हि करावा. ही आदर्श समाज-रचना आहे. ज्यांना शेती करतां येत नाहीं असे लोक स्वत:जवळ जमीन बाळगतात. मी म्हणतों कीं ज्यांना दुसरा धंदा नाहीं आणि जे शेती करूं इच्छितात अशा भूमि-हीनांना जमीन दिली पाहिजे. माझ्या कल्पनेप्रमाणें आमच्या प्रधान मंत्र्यानें हि चार तास शेती करावी आणि चार तास इतर काम करावें. माझ्या योजनेंत एक असेल शेतकरी-ब्राह्मण, अेक असेल शेतकरी-सुतार, अेक असेल शेतकरी-विणकर, अेक असेल शेतकरी-प्रोफेसर. हा माझा आदर्श आहे.

## प्राथमिक धर्म

आठ आठ तास शेती करण्याची जरूर नाहीं. पण प्रत्येकानें थोडा वेळ या कामांत अवश्य दिला पाहिजे. भाजीपाला तरी प्रत्येकानें उत्पन्न करायला हवा. अशा रीतीनें मी शेती ' हा प्राथमिक धर्म ' मानतों. हा धर्म सर्वांना उपलब्ध हवा. कांहीं लोक म्हणतात, लहान लहान तुकडे केले तर, पीक कमी येईल. परंतु त्यांनीं स्वत: शेतीचें काम केलेलें नाहीं, मीं तें केलें आहे. लहान लहान तुकड्यां-तून किती भरपूर पीक येतें हें मीं अनुभविलें आहे. कांहीं जण असे म्हणतात, शेतकऱ्यांनीं आठ आठ तास शेती करावी आणि इतरांनीं त्यांचे व्यवसाय तसे च आठ आठ तास करावें. परंतु तें चूक आहे. सृष्टीच्या सेवेपासून कोणाला हि वंचित ठेवतां कामा नये.

### आरोग्य-योजना

मनुष्याला सर्वांत जास्त कशाची आवश्यकता असेल तर ती आकाशाची. आकाश खूप सेवन करावें. त्याचें अजीर्ण होत नाहीं. दुसरी आवश्यक वस्तु हवा. हवा हि खूप सेवन करावी. तिच्यापासून पोषण मिळतें. तिसरी वस्तु सूर्यप्रकाश. चौथी वस्तु पाणी. अन्नाची गरज त्या मानानें कमी. म्हणून अन्न कमी खाल्लें पाहिजे. दुसरीं जीं चार सूक्ष्म 'भूतें' आहेत त्यांचें सेवन भरपूर केलें पाहिजे. अन्न कमी खावें याचा अर्थ अुपाशी रहावें असा नाहीं. त्याचें महत्त्व कमी मानावें इतकें च. मानव-जीवनाच्या योजनेंत हवा, पाणी आणि आकाश भरपूर मिळायला हवें. सृष्टीशीं संबंध राखून हा क्रम ध्यानीं आला तर मनुष्याचें आरोग्य उत्तम राहील.

: ४ :

# सरकार

सरकार ही इतकी भयंकर वस्तु आहे कीं तिच्याहून भयंकर वस्तु दुसरी नाहीं. आजच्या इतकें प्रबल सरकार जगांत पूर्वी कधीं नव्हतें. सरकार चालविणारांचें म्हणणें असें कीं जनकल्याण करण्यासाठीं त्यांनीं सत्ता आपल्या हातीं ठेवली आहे. समाजावर इतकें नियंत्रण ठेवलें आहे कीं सर्वांची शेंडी मूठभर लोकांच्या हातीं आहे. आज सारें जग भयभीत आहे. देशांच्या प्रतिनिधींनीं देशाच्या बऱ्या वाईटाचें चिन्तन करण्याची सत्ता आपल्या हातीं ठेवली आहे. सामान्य जनता पंगु आहे, दीन आहे, तिला वाटतें

सरकारशिवाय आमचें कसें चालणार ? जनतेला मत देण्याचा नाममात्र अधिकार मिळालेला आहे. हा अधिकार म्हणजे मेंढरांनीं धनगर निवडण्याचा च प्रकार आहे. त्यामुळें मेंढरांच्या स्थितींत थोडा हि फरक पडत नाहीं. असें हें नाटक चालू आहे. आणि सरकारांत सत्तेचें केन्द्रीकरण होत आहे.

## बुद्धि-स्वातंत्र्यावर प्रहार

रशियांत हें च चालू आहे. प्रजेला चांगलें अन्न किती देतां येईल याचा निर्णय सरकार करतें. परंतु अन्नाचा प्रश्न गौण आहे. बुद्धिस्वातंत्र्य ही महत्त्वाची वस्तु आहे. जनतेच्या बुद्धीचें नियंत्रण सरकार करतें. कोणा हि ज्ञानी मनुष्याच्या हातीं आजवर जी गोष्ट नव्हती ती आज शिक्षण-खात्याच्या हातांत आहे. ज्ञानी मनुष्यांनीं उपनिषदें लिहिलीं खरी, परंतु ते सक्ती करूं शकत नव्हते कीं जनतेनें त्यांचे च ग्रंथ वाचावे. परंतु शिक्षण खात्याचे अधिकारी आज जीं पाठ्यपुस्तकें नेमून देतात, त्यांचें च अध्ययन विद्यार्थ्यांना करावें लागतें आणि त्यांची च परीक्षा द्यावी लागते. सरकार फॅसिस्ट असेल तर फॅसिस्ट विचारांचीं पुस्तकें मिळतील, भांडवलशाही सरकार भांडवलशाहीला पोषक पुस्तकें विद्यार्थ्यांना वाचायला लावील. कम्युनिस्ट सरकार आपल्या विचारांचें अध्ययन करायला विद्यार्थ्यांना भाग पाडील. ज्या प्रकारचें सरकार, त्या प्रकारची 'विद्या' विद्यार्थ्यांना दिली जाणार ! स्वातंत्र्याचा ज्यांना जास्तींत जास्त अधिकार, त्यांच्या डोक्यांत तयार मालाप्रमाणें विचार कोंबले जाणार !

स्वातंत्र्याचा सर्वांत अधिक अधिकार विद्यार्थ्यांना आहे. ते सांगू शकतात कीं 'ज्ञानांत जबरदस्ती चालणार नाहीं, आम्हांला

योग्य वाटेल तें च आम्ही शिकूं.' प्राचीन काळचे ऋषि म्हणत, 'यानि अस्माकं सुचरितानि तानि त्वया उपास्यानि नो इतराणि' 'आमच्या चांगल्या गोष्टींचें च अनुकरण करा, इतर गोष्टींचें करूं नका.' परंतु आज शिस्त हा सर्व गुणांचा राजा मानला जातो.

आज-काल लोक म्हणतात, विद्यार्थ्यांत शिस्त नाहीं. उलट मला या गोष्टीचें आश्चर्य वाटतें कीं शिक्षण इतकें रद्दी असून हि विद्यार्थी इतकी शिस्त कशी पाळतात !

## रद्दी शिक्षण

आज विद्यार्थ्यांना जें साहित्य शिकविलें जातें तें त्यांना यत्किंचित् उपयोगाचें नाहीं. संस्कृत शिकवायचें तर श्रृंगारिक साहित्य च शिकवितात. गीता किंवा उपनिषद् शिकविणार नाहींत. तिकडे विद्यार्थी सिनेमा पाहत च असतात. भारताची राजधानी दिल्ली. तेथील भगिनींनीं सरकारला विनंति केली कीं 'आमच्या मुलांना वांचवा. त्यांचें शील व चारित्र्य बिघडत चाललें आहे, म्हणून सिनेमा बंद करा'. अशी मागणी करण्याची पाळी भगिनींवर यावी ही शरमेची गोष्ट आहे. अशी सर्व परिस्थिति असतांना विद्यार्थी चांगले कसे राहतील ? हे लोक म्हणतात, या च शिक्षणांतून तर टिळक, गांधी, निर्माण झाले. हें शिक्षण तुम्ही टाकाऊ कसें म्हणतां ? मी उत्तर देतों कीं टिळक आणि म. गांधी या शिक्षणामुळें नव्हे परंतु असें टाकाऊ शिक्षण असून हि निर्माण झाले. आणि असें ते स्वतः म्हणत असून हि त्यांचा हवाला देण्यांत येऊन असलें रद्दी शिक्षण चालू ठेवण्यांत येते. साडे चार वर्षांचा माझा अनुभव असा आहे कीं माझ्या सभांना विद्यार्थ्यांची संख्या जितकी जास्त तितकी सभांतून शांतता जास्त. शिस्त हा

कांहीं सर्वश्रेष्ठ गुण नव्हे. त्यामधें एका माणसाची आज्ञा दुसऱ्याला पाळावी लागते. हल्ला करण्याची आज्ञा मिळाली कीं हल्ला करावा लागतो. याला काय सद्गुण म्हणायचें ? आमचे ऋषि मुनि सांगत कीं ईश्वराची आज्ञा पाळावी. गुरू नानक म्हणत कीं 'हुक्म रजाई चल्लणा नानक लिखिया नाव.' इतरांच्या आज्ञेनुसार चालणें मला माहीत नाहीं. परंतु हे लोक आज परमेश्वराऐवजीं सरकारचा हुकूम मानण्याच्या गोष्टी करतात. यांचें श्रेष्ठ उपनिषद् वाक्य आहे.

"Yours not to question why
Yours but to do and die"

'कां हें विचारणें तुमचें काम नाहीं. करा आणि मरा हें च तुमचें कर्तव्य' ही त्यांची रीत आहे. बापाला गोळी मार असा हुकूम झाला, तर मुलानें बापाला गोळी घातली पाहिजे. याचें नांव डिसिप्लिन, शिस्त ! अशा शिस्तीनें देशाचें काय कल्याण होणार ? सरकार देशांतील सर्व विद्यार्थ्यांना या तऱ्हेचें शिक्षण देत आहे. अशा सरकारपासून आमची सुटका होत नाहीं तोंवर जगांत शांति नांदणें शक्य नाहीं.

**'सरकार' ही संस्था नष्ट करा.**

कम्युनिस्टांचें म्हणणें असें आहे कीं सरतेशेंवटीं सरकारचा क्षय व्हावा हें खरें, पण आज तें पुष्ट झालें पाहिजे. म्हणजे क्षय उधार, पुष्टि रोख ! आजच्या परिस्थितींत सरकारला बलवान् करण्याची गोष्ट बोलण्याचा अर्थ गुलामगिरीशिवाय दुसरा होत नाहीं. म्हणून आजपासून च सरकारचा क्षय झाला पाहिजे, हा सर्वोदय-विचार होय.

व्यक्तीपुरतें सांगायचें तर प्रत्येकानें आपल्या मनावर आणि इंद्रियांवर नियंत्रण ठेवायला शिकलें पाहिजे. समाजांत परस्परांच्या कल्याणाचा परस्परांशीं विरोध नाहीं हें ध्यानीं घेऊन समाज-रचना करायला हवी. सरकारची मुळीं च आवश्यकता नाहीं हें ओळखून आजपासून च त्याचा क्षय करण्याची सुरवात करायला हवी.

---

: ५ :

# " खऱ्या शांतीची भूक "

**असंतोषांतून प्रेरणा**

आज जगांत सर्वत्र संघर्ष चालू आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. कोणत्या हि देशांत पहा, असंतोषाचा, डोम उसळलेला दिसेल. असंतोषांतून फार मोठी चिन्तन-प्रेरणा मिळते. असंतोष असेल तेथें च जीवन प्रकट होतें. दगडावर पाऊस पडला तर त्याची त्याला पर्वा नाहीं. कोणीं त्याचे तुकडे केले तरी हि पर्वा नाहीं. दगडाच्या जीवनांत असंतोष, अशांति, दुःख, कांहीं नाहीं. तुम्ही विचाराल तुम्ही कधीं दगड होतां का ? मग दगडाला असंतोष, अशांति, नसते हें तुम्हाला कसें कळलें ? माझ्यापाशीं त्याचें उत्तर नाहीं. पण मी एवढें च म्हणेन कीं सुख हि नाहीं व दुःख हि नाहीं अशी अवस्था मला पसंत नाहीं.

**व्यापक चिंतन**

लोक म्हणतात, जगांत आज जेवढें दुःख, अशांति, आणि असंतोष आहे तितका पूर्वी कधीं नव्हता. हें खरे हि असू शकेल, परंतु आज जितकें व्यापक चिंतन जगांत चालू आहे तितकें पूर्वी

क्रमांक 28736 दि: 1-7-93

कधीं नव्हतें. मानव-समाज कसा बनला याचें चिंतन आज लहान लहान मुलें सुद्धां करतांना दिसतात. कोणी 'कॅपिटल' सारखीं लठ्ठ पुस्तकें वाचतात तर कोणी महाभारत. कोणी सर्वोदय-विचाराचें अध्ययन करतात तर कोणी समाजवादी विचाराचें. जगांत मुख्य वस्तु कोणती, विश्वशांति कशी होईल, राज्यसंस्था नष्ट कशी होईल या विषयांची हि चर्चा होते. सर्व जगाचें मिळून एक साम्राज्य बनावें या सारख्या व्यापक विचाराचें चिन्तन व मनन लहान मुलें सुद्धां करतात. ज्या विचारांच्या बाबतींत प्राचीन काळीं मोठमोठे तत्त्वज्ञानी सुद्धां निश्चित निर्णय देऊं शकत नसत अशा गोष्टींचा निर्णय आज छोटीं मुलें करतात.

**स्त्रीवर पुरुषाची मालकी.**

महाभारतांतील गोष्ट आहे. द्रौपदीला फरफटत भर सभेंत आणून उभी केली. ती विचारते, 'द्यूतामधें बायको पणाला लावतां येते का? स्त्री ही पुरुषाच्या मालकीची आहे का?' आज आमचीं मुलें म्हणतील कीं हा कांहीं गहन प्रश्न नाहीं. पण त्या काळीं या प्रश्नाचें उत्तर भीष्म-द्रोणांपाशीं देखील नव्हतें. 'भीष्म, द्रोण, विदुर भये विस्मित'. भीष्म, द्रोण, वगैरे परम ज्ञानी होते. पण स्त्री ही पुरुषाची व्यक्तिगत संपत्ति आहे किंवा नाहीं, या प्रश्नाचें अुत्तर ते देऊं शकले नाहींत. प्रश्न ऐकून ते आश्चर्यचकित झाले. त्यांना निर्णय करणें कठिण वाटलें.

आपण या रीतीनें विचार करूं लागलों म्हणजे आपल्या ध्यानांत येतें कीं हल्लीं चिंतन किती व्यापक होऊं लागलें आहे. प्राचीन काळीं लहान सहान समस्यांवर विचार होई. पण लोक

अंतिम निर्णय करूं शकत नसत. त्या दृष्टीनें पाहिलें तर आज आपण किती भाग्यवान आहोंत हें ध्यानांत येईल. त्या काळीं जुवा (द्यूत) खेळणें 'धर्म' समजला जाई. आजचें लहान मूल सुद्धां म्हणेल कीं जुवा खेळणें हा कोठला धर्म ?

त्या काळचे लोक म्हणत कीं कोणीं जुवा खेळायला बोलावल्यावर 'नाहीं' म्हणणें हा क्षत्रियाचे दृष्टीनें अधर्म आहे. धर्मराजाला निमंत्रण मिळालें तेव्हां त्या परम धर्मनिष्ठ राजानें धर्म समजून तें निमंत्रण स्वीकारलें. मी त्या महाज्ञानी पुरुषाची टिंगल करीत नाहीं. तो जमाना वेगळा होता. तेव्हांच्या समस्या वेगळ्या होत्या. आज आम्हांला अधिक ज्ञान आहे, अधिक दूरचें दिसतें. याचें कारण आपण त्या पूर्वजांच्या खांद्यावर उभे आहों. बापाच्या खांद्यावर उभें राहिलें की मुलाला बापापेक्षां दूरचें दिसतें. भीष्म द्रोण ज्या गोष्टींचा निर्णय करूं शकत नसत त्यांचा निर्णय आपण करूं शकतों. याचा अर्थ असा नाहीं कीं, आपण त्यांच्याहून अधिक ज्ञानी आहों. याचा अर्थ इतका च कीं समाजानें विचार-क्षेत्रांत प्रगति केली आहे.

**संघर्ष नको, मंथन हवें.**

हल्लींच्या समस्यांचें स्वरूप व्यापक आणि जागतिक असतें. भूगोल शिकवितांना एका च गोलावर साऱ्या पृथ्वीचा नकाशा काढलेला असतो. प्राचीन काळीं बादशहांना हि या गोष्टीचें ज्ञान नसे कीं जगांत देश किती आहेत. म्हणून आज जो संघर्ष चाललेला दिसतो त्याचा खेद वाटण्याचें कारण नाहीं. कारण हा संघर्ष नसून मंथन आहे. दोन लाकडें एकमेकांवर घासलीं तर त्यांतून अग्नि निर्माण होतो, व तो दोहोंना हि भस्म करतो. त्याप्रमाणें

संघर्षानें विनाश होतो, परंतु मंथनानें लोणी निघतें. कांहीं लोक विचारतात, 'तुम्ही संघर्षवादी आहांत का ?, मी म्हणतों, 'नाही'. मग ते विचारतात, 'तुम्ही जैसे थे 'स्टेटसको' वादी आहांत का ? मी उत्तर देतों कीं, मी संघर्षवादी नसून मंथनवादी आहें. विचारांचें मंथन झालें कीं त्यांतून निर्णयरूपी लोणी निघतें. आज जग अशा रीतीनें निर्णयाच्या जवळ येऊं लागलें आहे.

## अहिंसेच्या मार्गानें शांति

बुल्गानिन हिंदुस्थानभर फिरून गेले. त्यांना कोणीं 'मार्शल' म्हटलें तर पसंत पडत नसे. मार्शल असून हि मार्शल म्हटलेलें त्यांना आवडत नसे. मार्शल म्हणवून घेण्याची लाज वाटणें ही फार मोठी वस्तु आहे. जगांत आज ज्यांच्यापाशीं हिंसेची जास्तींत जास्त शक्ति आहे त्यांना शांति हवी आहे. आजवर शांतिपाठ केवळ ब्राह्मण च करीत असत. पण आज जगांतील सर्वांत मोठी ताकत ज्यांच्या हातांत आहे असे लोक हि शांतीचा जप करीत आहेत. महात्मा गांधींच्या निधनानंतर शोक-प्रदर्शन करतांना मॅक आर्थरनें म्हटलें होतें कीं, जगाला शांति प्राप्त करायची असेल तर आज ना उद्यां त्याला गांधींचा च मार्ग अनुसरावा लागेल. इतका पराक्रमी मॅक आर्थर गांधींच्या मृत्यु-प्रसंगीं असे उद्गार काढतो याचें मर्म काय ? मला या बाबतींत तिळमात्र शंका नाहीं कीं, आज नाहीं उद्यां, जगाला अहिंसेचा मार्ग च स्वीकारावा लागेल.

## आज नाहीं म्हणून च उद्यां

आज कोणी भूदानांत जमीन दिली नाहीं तर मी म्हणतों, आज त्यानें एवढ्यासाठीं च दिली नाहीं कीं तो उद्यां देणार आहे.

कोणीं आज दिली तर तो 'आजचा दाता' म्हणून मला आनंद होतो. जो आज देत नाहीं तो आमचा 'उद्यांचा दाता' आहे. दोन्ही हि गोष्टींत मला आनंद आहे. त्या च प्रमाणें कोणी आज शांतीची गोष्ट बोलत असेल तर तो आजचा शांतिवादी आहे. पण आज जो अशांतीची गोष्ट बोलतो आहे तो उद्यांचा शांतिवादी आहे इतकें च. शांति दोघांना हि हवी आहे. म्हणून जे आज आमच्याशीं सहकार करीत नाहींत ते उद्यां करणार आहेत, हें मला माहीत आहे.

**हिंसेचें व्यापक स्वरूप**

प्राचीन काळीं भांडणांचा निर्णय पुष्कळदां द्वंद्व युद्धानें करीत असत. राज्य भीमाचें कीं जरासंधाचें? द्वंद-युद्ध करून ठरवा. ज्याचा जय त्याचें राज्य! भीम आणि जरासंध यांचें द्वंद्व-युद्ध झालें तर त्यांत प्रजेला पीडा होत नसे. प्रजा तें युद्ध पहायला प्रेक्षक म्हणून हजर राही. परंतु आजची हिंसा इतक्या लहान प्रमाणावर नसते. तिनें व्यापक आगीचें रूप घेतलें आहे. आज लढणारे आणि न लढणारे सर्वांना च पीडा होते. कुस्तीनंतर युद्धाचें युग आलें. प्लासीच्या लढाईत लहानशा मैदानावर एका बाजूला भारताची फौज आणि दुसऱ्या बाजूला इंग्रजांची फौज होती. त्या लढाईंत प्राण-हानि देखील मर्यादित होती. स्त्रिया, मुलें, म्हातारे, रोगी आणि सामान्य नागरिक त्यांत सामील नव्हते. पण हल्लीं एका संपूर्ण देशाशीं दुसऱ्या संपूर्ण देशाचें युद्ध होतें आणि तें भीषण असतें.

उद्यां जर जाहीर झालें कीं, रशिया आणि अमेरिका यांमधें युद्ध होणार आहे तर रशियाच्या बाजूला १०।२० राष्ट्रें उभीं राहतील, अमेरिकेच्या बाजूला १०।२० राष्ट्रें उभीं राहतील

आणि भयंकर लढाई होईल. मग एका बाजूच्या पुरुषांचें विरुद्ध बाजूच्या पुरुषांशीं, बायकांचें बायकांशीं, बैलांचें बैलांशीं, गाढवांचें गाढवांशीं युद्ध सुरू होईल. इतकें च काय पण इकडच्या झाडांचें तिकडच्या झाडांशीं आणि इकडच्या गिरण्यांचें तिकडच्या गिरण्यांशीं युद्ध होईल. बाँब पडले तर गाढवें, घोडे, गिरण्या, स्त्रिया सर्वांचा संहार होईल. अमेरिकेंतील गाढवांच्या हें स्वप्नीं हि नसेल कीं, त्यांचा रशियांतील गाढवांशीं कांहीं विरोध आहे. आज असें सांगतात कीं, देशांतील सर्वांनीं देशासाठीं मरावें. सर्व च मेले तर शिल्लक काय राहणार ? मग काय दगडधोंड्यांसाठीं मरायचें आहे ?

अशी भीषण आपत्ति आज जगासमोर उभी आहे. तिच्या च भयानें लोक 'शांति' 'शांति' असा जप करूं लागले आहेत.

### ही प्रेरणा कशामुळें ?

प्राचीन काळीं ब्राह्मण शांतीचा जप करीत. पण त्याला कारण होतें. त्यांना वाटे कीं, जगांत शांति राहिली तर लोक आम्हांला लाडू खायला घालतील. आज जो शांतीचा जप चालला आहे तो भयामुळें आहे. परंतु भयामुळें शांतीचा जप करण्यानें जगांत शांति नांदणें शक्य नाहीं. शांतीचें स्वतंत्र मूल्य आहे हें ओळखूं तेव्हां च शांति नांदेल. हल्लीं सर्व च देश म्हणतात कीं, आम्हांला शांतीची आवश्यकता आहे. चीन म्हणतो शांतीची आवश्यकता आहे, रशिया हि असें च म्हणतो. आणि हिंदुस्तान तर म्हणतो च आहे कीं, आमच्या देशाचा आम्हांला खूप विकास करायचा आहे, आर्थिक समता आणायची आहे, म्हणून आम्हांला शांति हवी.

एक होता शेतकरी. त्यानें बीं पेरलें. पाऊस पडेना. त्याला पाण्याची फार आवश्यकता होती. त्यानें पाऊस पडावा म्हणून

अीश्वराची प्रार्थना केली. मग पाऊस पडला आणि पीक आलें. तेव्हां तो शेतकरी म्हणूं लागला 'आतां पाऊस नको.' तसें देश विकसित झाल्यावर यांना शांतीची गरज नाहीं ! पिकासाठीं लागणारी पावसाची गरज निरपेक्ष नसून सापेक्ष असते. परंतु तहानेल्याला पाण्याची गरज नेहमींसाठीं असते. म्हणून मी या मोठ्या लोकांना विचारूं इच्छितों कीं, तुम्हांला पाणी पिकासाठीं हवें आहे कीं पिण्यासाठीं ?

## सर्वोदय केव्हां होईल ?

वाटेल त्या उद्देशानें शांतीचा जप करून शांति मिळणार नाहीं. आतां काळ असा येणार आहे कीं, साऱ्या समाजाला शांतीची तहान लागेल. जगाच्या हें ध्यानांत येईल कीं शांतीमधें च शक्ति आहे आणि शांतीनें च प्रश्न सुटूं शकतात. शांतीची अशी खरी तहान लागल्या-नंतर जेव्हां समाज शांति इच्छील तेव्हां सर्वोदय होईल.

## समस्यांचें स्वागत

म्हणून, जेव्हां समस्या निर्माण होतात, किंवा महायुद्धाच्या गोष्टी बोलल्या जातात, तेव्हां मी त्यांचें स्वागत करतों. कारण त्यानंतर जग शांतीच्या मार्गाला लागणार आहे.

आज जगापुढें प्रश्न आहे कीं युद्ध हवें कीं, शांति हवी ? शांतीच्या प्रेरणेसाठीं आतां युद्धांची आवश्यकता नाहीं. युद्ध झालें च तर अेक च मोठें होईल. आणि त्यानंतर सगळे जग जरूर शांतीच्या मार्गावर येईल. म्हणून माझी यात्रा मीं मोठ्या आनंदानें चालू ठेवली आहे. जगांत अशांति व असंतोष जितका

तीव्र होतो तितकी मला अधिक गाढ झोंप लागते. सर्व जण शेंवटीं आमच्या च मार्गावर येणार आहेत असें मी मानतों. भारतानें आपलें डोकें ताळ्यावर ठेवलें तर तो जगाला शांतीचा मार्गदर्शक बनूं शकेल.

## भूदान-यज्ञाची प्रगति

भूदान-यज्ञ कसा चालला आहे ? एक होता कांसव, एक होता ससा. दोघांमधें शर्यत लागली कीं कोण पुढें जातो. ससा धावूं लागला. खूप पुढें गेला. मग त्यानें पाहिलें कीं कांसव फार हळूं चाललें आहे आणि खूप मागें राहिलें आहे. त्याला झोंप येऊं लागली. तो गाढ झोंपीं गेला आणि इकडे कांसव हळूं हळूं मुक्कामावर पोंचून गेलें. तसें तिकडे लोक धांवपळ करीत आहेत आणि इकडे भूदानयज्ञाचा कांसव आपल्या चालीनें चालत आहे. एकीकडे मोठमोठीं यंत्रें, प्रचंड कारखाने चालू आहेत. त्यांच्यापुढें हें कांसव कसें जाऊं शकेल ? असा प्रश्न लोक विचारतात. मी म्हणतों कीं ज्या हातांनीं हीं यंत्रें बनविलीं ते च हात यंत्रांना नष्ट करणार आहेत.

## अमेरिकेसाठीं संदेश

आमच्या पदयात्रेंत कधीं कधीं परदेशी यात्री सामील होतात. एक अमेरिकन बंधु आले होते. ते परत जातांना म्हणाले कीं अमेरिकेसाठीं कांहीं संदेश द्या. मीं म्हटलें कीं अमेरिकेला संदेश देण्याइतकें धाष्टर्य माझ्यामधें नाहीं. मी फक्त सेवा करणें जाणतों आणि त्याप्रमाणें सेवा करीत आहें. परंतु ते म्हणाले कीं 'मी परत गेल्यावर लोक मला विचारतील कीं तुम्हीं तेथें काय

काय ऐकलें? विनोबांनीं काय सांगितलें ? तर त्यांना उत्तर काय देऊं ?' मग मला वाटलें कीं चार शब्द सांगावे. म्हणून मीं म्हटलें कीं निव्वळ अमेरिकेसाठीं नव्हे तर अमेरिका आणि रशिया दोहोंसाठीं मी सांगेन कीं तुम्ही अजस्त्र जहाजें, शस्त्रास्त्रें वगैरे बनवीत आहांत तो तुमचा कार्यक्रम चालू च ठेवा. नाहीं तर तुमच्या देशांत बेकारीचा प्रश्न उभा राहील. परंतु मी तुम्हांला आणखी एक गोष्ट सांगतों. तुम्ही शस्त्रास्त्रांच्या राशी तयार करतां आणि युद्ध सुरू झालें कीं अमेरिका रशियाचीं, व रशिया अमेरिकेचीं, जहाजें बुडवितो असें करूं नका. रशिया आणि अमेरिका दोन्ही ख्रिस्ती देश आहेत, तेव्हां २५ डिसेंबरला ख्रिसमसचा शुभ दिवस येतो. त्या दिवशीं प्रत्येकानें आपापलीं जहाजें आणि शस्त्रास्त्रें समुद्रांत बुडवावीं. परस्परांनीं परस्परांचीं बुडवायचीं त्या ऐवजीं स्वावलंबनानें स्वतःचीं च स्वतः बुडविणें चांगलें नाहीं का ? अशानें येशु ख्रिस्ताच्या शांति-संदेशाचें पालन होईल, बेकारी वाढणार नाहीं आणि कोणाला कष्ट हि होणार नाहींत. हा कार्यक्रम पहायला मुलें सुद्धां हजर राहतील. सर्वांना चार पांच दिवस सुट्टी द्या, आणि एक जानेवारीला कारखाने पूर्ववत पुन्हां सुरू करा.

हें ऐकून त्या गृहस्थांना हसूं आलें. मीं म्हटलें कीं तुम्ही हंसा बापडे. पण मी हा संदेश अगदीं गंभीरपणें देत आहें. कारण तुम्ही च सांगतां कीं युद्धामुळें कामधंदा मिळतो. युद्धें बंद झालीं तर इतक्या सर्वांना काम कसें द्यायचें ही समस्या उभी राहील !

## रिक्षा हा हि उद्योग

मीं रिक्षा बंद करायला सांगितलें तर म्हणतात, 'मग इतक्या सर्वांना काम कसें द्यायचें ?' म्हणजे रिक्षा हा हि एक उद्योग

झाला. धडधाकट लोक हि त्यांत बसतात. मी म्हणेन कधीं कधीं उलटें करीत जा. म्हणजे खेचणाराला किती कष्ट होतात तें ध्यानीं येईल. ह्या गोष्टी या मंडळींच्या ध्यानांत येत नाहींत असें नाहीं. तरी हें सर्व चालू आहे आणि समस्या निर्माण होत आहेत.

**किरकोळ भांडणांचें भय**

अलीकडे इतक्या समस्या निर्माण होण्याचें कारण एक च. तें हें कीं आपण योग्य रीतीनें विचार करीत नाहीं. लहान लहान झगडे जितके भयावह असतात तितके हायड्रोजन किंवा ॲटम बाँब भयावह नसतात. हे बाँब दूर विदेशांत बनतात पण त्यांचा जप चालतो भारतांत. मी बिहारमधें फिरत असतां एकदां बैद्यनाथ-धामला गेलों. तेथें यात्रेकरू 'बम बोलो भोलानाथ' 'बम बोलो भोलानाथ' असा गजर करीत. तेव्हां माझ्या ध्यानांत आलें कीं बाँब बनविणारे भोलानाथ असतात. अशा तऱ्हेचे भोळे आपण बनतां कामा नये. आपलें डोकें शाबूत ठेवलें पाहिजे.

लहान लहान ठिणग्यांतून च मोठ्या आगी लागतात. म्हणून लहान तंटे होणार नाहींत याची दक्षता आपण बाळगायला हवी. हे तंटे मिटले कीं काळजीचें कारण नाहीं. लोक मला धाक घालतात कीं 'युद्धानें नाश होईल' मी म्हणतों, यांत भीति कसली? आम्ही हि मरू तुम्ही हि मराल! तुम्ही मर्त्य आहांत, मी हि मर्त्य आहें. मग यांत दुःख कसलें करायचें? मला तर फार आनंद वाटेल. मी म्हणेन कीं भूदानाची दगदग मिटली, सारी मानव जाति च मुक्त झाली म्हणून कोणी जागतिक युद्धाचा धाक घातला तर तुम्ही बिलकुल भिऊं नका. एवढें च उत्तर द्या कीं हा निव्वळ मूर्खपणा आहे.

२८१३६ ४३
१२९०

## सत्याग्रहाचा नवा मार्ग

मला विश्वयुद्धाची काळजी वाटत नाहीं. त्याची काळजी विश्वयुद्ध स्वत: वाहील. पण मुंबईंत झगडे होणार नाहीत, बेल्लारींत झगडे होणार नाहींत, गांवांत झगडे होणार नाहींत, एवढी दक्षता आपण बाळगली पाहिजे. देशांत दुःख आहे म्हणून झगडे होतात. म्हणून निव्वळ झगडे नकोत एवढें म्हणून भागणार नाहीं. महात्मा गांधींनीं आपल्याला सत्याग्रहाचा नवा मार्ग दाखविला आहे. सत्याग्रहामधें महान् शक्ति आहे. त्यानें अशांति शिल्लक राहणार नाहीं आणि झगडे हि होणार नाहींत.

## साधन उत्तम हवें

पूर्वीं लोक शांतीचा जप करीत म्हणजे ते आहे ती च स्थिति 'स्टेटस को' रहावी असें इच्छीत. त्यांना स्टेटसको पसंत होता पण अशांति नको होती. आतां नवा पक्ष निघाला आहे. त्याला स्टेटसको हि नको आणि अशांति हि नको.

एका मनुष्याला फार तहान लागली होती. स्वच्छ पाणी त्याला कुठें मिळेना. तो स्वस्छ पाण्याच्या शोधांत दूरवर भटकला. शेंवटीं त्याला एक गलिच्छ नाला दिसला. तो त्यांतलें घाणेरडें पाणी प्याला. तुम्ही त्याच्या समोर 'स्वच्छ पाणी' या विषयावर व्याख्यान झाल तर तो म्हणेल कीं स्वच्छ पाणी प्यावें हें मला हि माहीत आहे, पण तें कोठें च मिळेना म्हणून मी शेवटीं घाणेरडें पाणी प्यालों. त्या च प्रमाणें हिंसेनें प्रश्न सोडवावा असें कोणाला च वाटत नाहीं. परंतु लोकांना मार्ग सुचत नाहीं म्हणून ते भयभीत होऊन हिंसेचा मार्ग अंगीकारतात.

स्वच्छ पाणी प्यावें हें सर्वांना च कळतें. शुद्ध साधनें वापरावीं हें सर्वांना कळतें. प्रश्न एवढा च कीं हीं शुद्ध साधनें उपलब्ध करून घ्यायची खुबी गवसली पाहिजे.

**उत्पादन आणि समविभाजन**

कम्युनिस्टांमधें माझे पुष्कळसे चांगले मित्र आहेत. त्यांच्या-बद्दल मला अभिमान हि वाटतो. त्यांना प्रथम माझ्यासंबंधीं शंका होती. आतां त्यांच्या ध्यानांत आलें आहे कीं विनोबा हृदयपरिवर्तन करूं इच्छितो आणि तो कम्युनिस्टांचा मित्र आहे. कधीं कधीं त्यांची माझी चर्चा होते. ते म्हणतात कीं हिंदुस्थानांत उत्पादन फार कमी आहे. राहणीचें मान फार खालावलेलें आहे. मी म्हणतों कीं यासाठीं च तर परिश्रम करून उत्पादन वाढविलें पाहिजे. परंतु आज कांहीं लोकांना मुळीं च खायला मिळत नाहीं आणि कांहींना जरूरीपेक्षां जास्त मिळतें. आणि या दोघांमुळें डॉक्टरांची चंगळ होते. आज जो उठतो तो मेडिकल कॉलेजांत प्रवेश मिळवितो. हीं मेडिकल कॉलेजें शिल्लक रहावीं म्हणून चालू समस्या तशी च ठेवायची कीं काय, हा आपल्यापुढें प्रश्न आहे.

उत्पादनासोबत च समविभाजन हि व्हायला हवें. कांहीं लोक फक्त उत्पादनावर जोर देतात. पण असा एका च गोष्टीवर भर देणें एकांगी आहे. तुम्ही वितरणाची चर्चा करतां परंतु वांटायला उत्पादन कुठें आहे ? असा प्रश्न मोठमोठे पुढारी कधीं कधीं विचारतात. परंतु मी नम्रतापूर्वक त्यांना सांगूं इच्छितों कीं ही गोष्ट मला पटत नाहीं. उत्पादन आणि विभाजन दोन्हीं एकदम च व्हावीं असें मला वाटतें.

**सहयोग आवश्यक**

समजा, एका कुटुंबांत चार माणसें आहेत. त्यांतील तीन माणसें उत्पादन करतात परंतु आम्ही तिघे च खाऊं असें ते म्हणत

नाहींत चौघे मिळून खातात. म्हणून उत्पादन वाढविण्याचा आणि वितरणाचा कार्यक्रम एका च वेळीं व्हायला हवा. यांतून एक च गोष्ट केली तर संघर्ष होईल. समजा कीं आपल्या देशांत सामान्य जनतेची शक्ति आठ शेर आणि श्रीमंतांची दहा शेर. मिळून १८ शेर शक्ति आहे. उत्पादन कार्यांत ती सगळी अठरा शेर शक्ति लागायला हवी. पण उत्पादन आणि विभाजन एका वेळीं चालत नाहीं म्हणून झगडे होतात आणि शेंवटीं फक्त दोन च शेर शक्ति उपयोगी पडते. दहा अधिक आठ मिळून कामाला लागलों तर समस्या सुटणार नाहींत कारण दहा आणि आठ यांचा सहयोग हवा.

रा. क्र. ११५०५

## सत्य + प्रेम = सत्याग्रह

लोक मला विचारतात कीं 'तुम्ही सहयोगी समाज बनवू इच्छितां कीं सत्याग्रही ?' मी म्हणतो कीं भूदान हा सत्याग्रहाचा सर्वश्रेष्ठ उपाय आहे. मी गांवोगांव फिरतों, जमिनीची मालकी चुकीची आहे असा जप करतों. व्यापक प्रचार करतों. ऊन, पाऊस थंडी यांची पर्वा न करतां फिरत राहतों. हा च तर सत्याग्रह ! सत्याग्रहांत समोरच्या माणसावर प्रेम हवें. द्वेष करणें चुकीचें आहे. चित्तांत द्वेष असेल तर शस्त्रानें लढणें बरें. म्हणून प्रथम चित्तांतून द्वेष काढून टाकाल तेव्हां च सत्याग्रहाचें सामर्थ्य येईल. म्हणून महात्मा गांधी म्हणत कीं, 'सत्याग्रह' हा मध्यम-पदलोपी-समास आहे. सत्याग्रह म्हणजे 'सत्यासाठीं प्रेमपूर्वक आग्रह.' सत्य आणि प्रेम दोन्ही एकवटली म्हणजे समाज पुढें जाईल, उत्पादन वाढेल, आणि समस्या हि सुटतील.

★ ★

REFBK-0011505

# आमचीं भूदानविषयक कांहीं प्रकाशनें

| | |
|---|---|
| एकीनें रहा आणि नेकीनें वागा | ०-३-० |
| भूदान-यज्ञ समग्र दर्शन | १-०-० |
| विनोबांच्या सहवासांत | १-८-० |
| क्रांतीच्या दिशेने | १-०-० |
| क्रांतीच्या वाटेवर | १-०-० |
| भूदान संगीत | ०-५-० |
| श्रमदान | ०-१-० |
| १९५७ च्या क्रांतीचा उषःकाल | ०-४-० |